पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 14/03/2019 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर बसस्टॉप भिवापुर येथे दिनांक 13/03/2019 चे 22.30 वा. पासून 22.45 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन विना क्रमांकाच्या बोलेरो पिकअपचा चालक आरोपी नामे– अजय धनराज चौधरी, वय 23 वर्ष, रा. नागतरोली याने त्याच्या ताब्यातील वाहनात एकुण 09 गाई कि. 45,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण किंमती 7,45,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे महिला पोलीस नाईक श्री. मृणाल चाके, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1) (क) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम कलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास परिपोलीस उपनिरीक्षक श्री. प्रकाश नाईक हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बेला:– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावर गोरगाव (लांबट) येथे दिनांक 13/03/2019 चे 13.30 वा. ते 14.00 वा. दरम्यान दिनेश बाळाजी सरवटे, वय 22 वर्ष, रा. खुर्सापार हा विहीरीचे पाण्यात दोराचे साहाय्याने मोटारीची फिल्टरच्या प्लेटा काढण्यासाठी विहीरीत उतरला होता. दरम्यान दोर तुटल्याने विहीरीचे पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धोंडेबाजी सोनबाजी डुकरे, वय 55 वर्ष, रा. बेला वार्ड क्र. 04 यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार अशोक चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर